# CURRICULUM
# MARATHI
# (009)
# X
# 2025-26

अभ्यासक्रम प्रारुप -इयत्ता नववी, दहावी **(009)**

प्रस्तावना –

मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे. मानवाला मिळालेली ती अमूल्य अशी देणगी आहे. आत्मसंवाद व परसंवाद साधण्याचे ते एक प्रभावी साधन आहे की जे आपण लिखित किंवा मौखिक स्वरुपात व्यक्त करु शकतो. संवाद साधण्यासाठी लिहिणे, वाचणे, बोलणे, इशारे, हावभाव , मूक अभिनय, मुद्राभाव अशी अनेक माध्यमे आहेत. परंतु भाषा हे अतिशय प्रभावी साधन आहे. भाषा हे आपले विचार मते,भावना आणि जाणिवा प्रगट करण्याचे एक साधन आहे. ती भाषा कोणतेही असो मातृभाषा असो अथवा इतर भाषा असो. व्यक्तीच्या 'व्यक्त होणे' या स्थायीभावासाठी ती उपयुक्त आहे.भाषेच्या विकासाच्या अनेक पायऱ्यापैकी आकलन,शब्दसंग्रह वाढविणे, वाक्यरचना,शब्दोच्चारण हे चार प्रमुख टप्पे आहेत. व्यक्तीच्या विकासानुसार त्याचे स्तर उंचावत जातात.

'मराठी'महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा आहे. यास्तव ती आपणास अवगत असणे गरजेचे आहे. देवगिरीच्या यादवांच्या काळात उदयास आलेल्या या भाषेत महानुभव व वारकरी संप्रदायापासून आजतागायत अनेक तत्ववेत्यांनी,साहित्यिकांनी ती वाढविण्याची तिचे संवर्धन करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. मराठी भाषेतील वा.डमयाला प्रदीर्घ परंपरा आहे. लिखित वाड.मयाबरोबर लोक वाड.मयाची परंपरा आहे.

'माझा मराठीचि बोलु कौतुकें |परि अमृतातेहीं पैजासीं जिंके |

ऐसीं अक्षरें रसिकें मेळवीन| 'अशी प्रतिज्ञां संत ज्ञानेश्वरांनी केली आणि ती तडीस नेली. ' विवेकसिंधु' हा ग्रंथ लिहिणारे आद्य कवी मुकुंदराज,' ज्ञानेश्वरी','अमृतानुभव','चांगदेव पासष्टी' असे ग्रंथ लिहिणारे श्री संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषा संपन्न केली.

' मराठी असे आमुची मायबोली' असे प्रत्येक माणसाने अभिमानाने म्हटले पाहिजे. मराठीतून बोलणे, मराठीतून पत्रव्यवहार करणे, मराठी वृत्तपत्रे व ग्रंथाचे वाचन करणे हे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. महाराष्ट्राची राजभाषा मराठी असलेल्या या महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा आहेत.

२७ फेब्रुवारी हा जेष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस ' जागतिक मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. श्रवण कौशल्य म्हणजे ऐकणे, भाषण संभाषण कौशल्य म्हणजे बोलणे,वाचन कौशल्य म्हणजे आपल्यासमोरील मजकूर वाचणे, लेखन कौशल्य म्हणजे सुंदर सुवाच्च अक्षरात लिहिणे अशा सर्व कौशल्यांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी मराठी भाषा शिक्षण महत्वाचे आहे.

' लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म,पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी'

अशा सुंदर शब्दात कवी सुरेश भट यांनी माय मराठीचे वर्णन केले आहे. इ.स.१९६० मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंघ महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला. अशा या भाषेत आपले विचार,मते,कल्पना,भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडता याव्यात,भाषेवर प्रभुत्व हवे.भाषेचा विविध प्रकारे वापर करणे यास्तव विविध साहित्य प्रकाराचा समावेश प्रस्तुत प्रारुपात करण्यात आला आहे. या सर्व साहित्यप्रकारांतील आशय

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

आणि भाषा यांमधील वैविध्य मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे हे लक्षात आणून देईल. जीवनमूल्ये, जीवन कौशल्य विकसित होण्यासाठी या साहित्यकृतीची मदत होईलच, परंतु त्याबरोबर विचारक्षमता ,अभिव्यक्ती कौशल्ये आणि सृजनशिलता यांच्या विकासासाठी उपयुक्त होईल.

उद्दिष्टे

| क्षमता क्षेत्रे | क्षमता विधान |
|---|---|
| श्रवण | १.विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद ऐकून त्यांमधील सत्यता पडताळून पाहून त्याबाबत स्वतःचे मत निश्चित करता येणे.<br>२.सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या सूचनानुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.<br>३.औपचारिक व अनचौपचारिक संवाद व संभाषण ऐकूण आपले विचार मांडता येणे.<br>४. विविध साहित्यांतील भावार्थ समजून घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात , आरोह – अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>६.परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| भाषण – संभाषण | १.विविध पद्यप्रकारांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.<br>२.विषयानुरुप स्वतःचे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे.<br>३. विविध उपक्रमांचे नियोजन,आयोजन करुन त्यांत सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. प्रभावी भाषण – संभाषण कौशल्याची वैशिष्ट्ये समजून घेऊन त्यांचा योग्य वापर करता येणे. |
| वाचन | १. योग्य गतीने विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्वक वाचन करुन त्याचा आस्वाद घेता येणे.<br>३. संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या इ-साहित्याचे वाचन करुन आस्वाद घेता येणे.<br>४. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करुन , त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करता येणे.<br>५. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना व माहिती चिकित्सकपणे वाचून पडताळून पाहता येणे. |
| लेखन | १. लेखन करताना शुध्दलेखनाच्या नियमाचे पालन करता येणे.<br>२. वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचा,कल्पनांचा विस्तार करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वतःच्या विचारांची ,कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी,वाक्प्रचार,शब्दसमूह, सुभाषिते यांचा लेखनात प्रभावीपणे वापर करता येणे.<br>५. घटना, प्रसंग , स्वानुभव यांचे लेखन करता येणे.<br>६. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

**Marathi Curriculum (2025-26)**

इयत्ता दहावी

**CLASS – X – (CODE -009)**

| अ.क्र | पाठाचे नाव | लेखक/ कवीचे नाव |
|---|---|---|
| १ | तू बुध्दी दे ( केवळ वाचनासाठी) | गुरु ठाकूर |
| २ | संतवाणी - अ - अंकिला मी दास तुझा | संत नामदेव |
| ३ | शाल | रा.ग. जाधव |
| ४ | उपास | पु. ल. देशपांडे |
| ५ | दोन दिवस ( कविता) | नारायण सुर्वे |
| ६ | चुडीवाला | जयश्री रुईकर |
| ७ | फूटप्रिंट्स | डॉ. प्रदीप आवटे |
| ८ | ऊर्जाशक्तीचा जागर | डॉ रघुनाथ माशेलकर |
| ९ | औक्षण ( कविता) | इंदिरा संत |
| १० | रंग साहित्याचे | |
| १५ | खरा नागरिक | सुहास बारटक्के |
| १६ | स्वप्न करू साकार ( कविता) | किशोर पाठक |
| | स्थूलवाचन | |
| १ | मोठे होत असलेल्या मुलांनो | डॉ. अनिल काकोडकर |
| २ | व्युत्पत्ती कोश | |
| | व्याकरण :<br>➢ शब्दांच्या आठ जाती<br>➢ लिंग,वचन<br>➢ काळ<br>➢ वाक्याचे प्रकार-आज्ञार्थी, विधानार्थी,उद्गारवाचक ,प्रश्नार्थक<br>➢ समानार्थी, विरुध्दार्थी शब्द<br>➢ समास-द्विगू,द्वंद्व- ३ प्रकार,अव्ययीभाव. | |
| | वाचन व आकलन :<br>➢ एक अपठित गद्यांश (परिच्छेद)अंदाजे (150 -200 शब्द) बहुपर्यायी , लघुत्तरी<br>➢ एक अपठित पद्यांश(कविता) अदांजे (10 -12 ओळी) बहुपर्यायी , लघुत्तरी | |
| | लेखन :<br>➢ निबंध : आत्मवृत्त, कल्पनात्मक, वर्णनात्मक<br>किंवा<br>➢ मुद्दयांवर आधारित गोष्ट ( कथा)<br>➢ औपचारिक पत्र - मागणी , तक्रार (लिफाफा आवश्यक)<br>➢ जाहिरात लेखन | |

Textbook Prescribed - अक्षरभारती इयत्ता दहावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

## Paper Pattern 2025-26

| विभाग -अ - गुण **15** | | | | |
|---|---|---|---|---|
| घटक<br>Unit | उपघटक आणि विवरण<br>Sub-Unit & Description | **प्रश्न** प्रकार | प्रश्न संख्या | प्रतिप्रश्न गुण व एकूण गुण<br>Total Marks |
| विभाग -अ<br>वाचन व आकलन<br>अपठित गद्य | एक अपठित गद्यांश (परिच्छेद) अंदाजे (150 - 200 शब्द) | बहुपर्यायी (mcq)<br>(6 पैकी 5) | **5** | **5x1=5** |
| | | लघुत्तरी (saq)<br>(4 पैकी 3) | **3** | **3x1=3** |
| | एक अपठित पद्यांश (कविता) अंदाजे 10 -12 ओळी) साध्या सोप्या मराठी भाषेतील द्वितीय भाषेनुसार काठीण्यपातळी असलेली | बहुपर्यायी (mcq)<br>(5 पैकी 4) | **4** | **4x1=4** |
| | | लघुत्तरी (saq)<br>(5 पैकी 3) | **3** | **3x1=3** |
| विभाग - ब - गुण **20** | | | | |
| व्याकरण | शब्दांच्या जाती | बहुपर्यायी (mcq)<br>(5 पैकी 4) | **4** | **4x1=4** |
| | काळ ओळखा व बदला | लघुत्तरी (saq)<br>(4 पैकी 3) | **3** | **3x1=3** |
| | वाक्याचे प्रकार-(आज्ञार्थी,विधानार्थी २ प्रकार, उद्गारवाचक, प्रश्नार्थक) | लघुत्तरी (saq)<br>(4 पैकी 3) | **3** | **3x1=3** |
| | वचन- बदला (पाठयपुस्तक आधारित) | लघुत्तरी (vsa)<br>(3 पैकी 2) | **2** | **2x1=2** |
| | लिंग-बदला - (पाठयपुस्तक आधारित) | बहुपर्यायी (mcq)<br>(3 पैकी 2) | **2** | **2x1=2** |
| | समानार्थी शब्द- (पाठयपुस्तक आधारित) | बहुपर्यायी (mcq)<br>(3 पैकी 2) | **2** | **2x1=2** |
| | विरुध्दार्थी शब्द- (पाठयपुस्तक आधारित) | बहुपर्यायी (mcq)<br>(3 पैकी 2) | **2** | **2x1=2** |
| | समास ओळखा - (द्विगू,द्वंद्व -३ प्रकार, अव्ययीभाव) | बहुपर्यायी<br>(mcq)<br>(3 पैकी 2) | **2** | **2x1=2** |
| विभाग - क - गुण **30** पाठ्यपुस्तकावर आधारित | | | | |
| पाठ्यपुस्तक गद्य | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा | लघुत्तरी (vsa)<br>(5पैकी 3) | **3** | **3x1=3** |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. | बहुपर्यायी<br>(mcq)<br>(5 पैकी 3) | **3** | **3x1=3** |
| | क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. | दीर्घोत्तरी<br>(3 पैकी 1) | **1** | **1x3=3** |

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (30-40 शब्द) उत्तर लिहिण्यापूर्वी प्रस्तावना आवश्यक. | | | |
| | ड) वाक्प्रचार: (वाक्यातील वाक्यप्रचार व कंसातील वाक्प्रचार अर्थानुसार जोडया जुळवा) (पाठ्यपुस्तक आधारित) | लघुत्तरी (saq) (5) | **5** | **5x1=5** |
| पद्य (कविता) | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा | लघुत्तरी (vsa) (6 पैकी 4) | **4** | **4x1=4** |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. | बहुपर्यायी (mcq) (5 पैकी 4) | **4** | **4x1=4** |
| | क) संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा. (वैशिष्टये आवश्यक) | दीर्घोत्तरी (2 पैकी 1) | **1** | **1x3=3** |
| स्थूलवाचन **Supplimentary Reader** | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा | लघुत्तरी (7 पैकी 5) | **5** | **5x1=5** |

| विभाग –ड – गुण **15** लेखन | | | | |
|---|---|---|---|---|
| लेखन | निबंध लेखन- आत्मवृत्त /कल्पनात्मक/वर्णनात्मक (120-150 शब्द) किंवा मुद्द्यावर आधारित गोष्ट (कथालेखन)लिहा. ( शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) (120-150 शब्द) | विस्तारात्मक लेखन (3 पैकी 1) किंवा (2 पैकी 1) (वरील 5 पैकी कोणतेही 1) | **1** | **1x5=5** |
| | औपचारिक पत्र लेखन (मागणी-तक्रार) (लिफाफा आवश्यक) | विस्तारात्मक लेखन (2 पैकी 1) | **1** | **1x5=5** |
| | जाहिरात लेखन | प्रेरणात्मक लेखन / कलात्मक लेखन ( 2 पैकी 1) | **1** | **1x5=5** |

Internal exam : 20 Marks
Based on student's timely record submission, and assessment.
Notebook records ( Question / Answers, Creative writing, etc.)
Homework, Classwork , Periodic test, Subject Enrichment /Portfolio
Test book Prescribed - अक्षरभारती इयत्ता दहावी
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४

Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in